ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 9 | MAY - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# दख्खनच्या जोतिबाचा डोंगर : पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक पर्यटन स्थळ



**प्रा. एस.एन. पाटील**

**सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी, तालुका.वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग**

**Abstract –**

पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर हे एक ऐतिहासिक शहर ज्या शहराचे नाव आजही छत्रपती शाहू महाराज यांची करवीर नगरी म्हणून आवर्जून ओळखले जाते. अशा या कोल्हापूर जवळच वीस किलोमीटर अंतरावर एका लहानशा डोंगरावर हे जोतिबाचे देवस्थान वसलेले आहे.

या देवस्थानाला 'जोतिबाचा डोंगर' या नावाने ओळखले जाते. 'दख्खनचा राजा', 'दक्षिण काशी', 'वाडी रत्नागिरी' अशीही या धार्मिक स्थळाची नावे परिसरात परिचित आहेत 'जोतिबाच्या नावाने चांगभलं !' असा होणारा गजर हा इथला खास आणि तितकाच वैशिष्ट्यपूर्ण जल्लोष आहे. ज्यामध्ये ऐतिहासिकतेचा अभिमान आणि धार्मिकतेचा भक्तिभाव भरलेला सूर असतो. हा दख्खनचा राजा म्हणजेच जोतिबा !

महाराष्ट्रातील अनेक कुटुंबाचे कुलदैवत आहे. भाविक आपल्या शुभ कामाची सुरुवात ज्योतिबाच्या दर्शनानेच करतात. लग्नविधी आटोपल्यानंतर नवपरिणीत जोडप्याने या दैवताचे आशीर्वाद घेण्याची परंपरा कित्येक घरात वर्षांनुवर्षे चालत आलेली आहे. या दख्खनच्या राजाला गुलाल आणि खोबऱ्या बरोबरच त्रिगुणात्मक असणारी वनस्पती दवणा वाहण्याची परंपरा आहे. दवणा ही वनस्पती केदारनाथला प्रिय आहे. दवणा ही वनस्पती वात, कप, पित्त, या तीन दोषांवर गुणकारक आहे, जसे केदारनाथ हे ब्रह्म,विष्णू,आणि महेश यांचे त्रिगुणात्मक प्रतिबिंब आहे. तसा दवणा हा त्रिगुणात्मक आहे. जोतिबा या देवाला ज्योतिर्लिंग, केदारलिंग, रवळनाथ, सौदागर, अशा नावानेही ओळखतात. येथे कोणतेही अघोरी कृत्य,केले जात नाही. अग्नी, तेज,व ज्ञानाचे प्रतीक असलेल्या जोतिबा भक्तांना आपलासा वाटतो. लोकगीतातून याची प्रचिती येते. या गीतातून जनमनात असणारे जोतिबाचे मानाचे स्थान सहज व्यक्त होते.

**Keywords -** दख्खनचा राजा ज्योतिबा, दक्षिण काशी, चांगभलं !, डोंगर, गुलाल-खोबरे इ.

## प्रस्तावना -

पश्चिम महाराष्ट्र हा भूभाग भौगोलिकदृष्ट्या समृद्ध आणि तितकाच विलोभनीय आहे. नद्यांचे बारमाही वाहते प्रवाह आणि त्यांच्या काठाने डोलणारे हिरवेगार शेतमळे हा या भूभागाचा विशेष आहे. त्यामधील कोल्हापूर शहर ऐतिहासिक दृष्ट्या अनेक संदर्भाने महत्त्वाचे असल्याने त्याच्या खानाखुणा आजही या मातीमध्ये दिमाखात उभे आहेत. मूळचे हे छत्रपतींची शाहू नगरी पंचगंगा नदीच्या काठावर वसलेली ही करवीर नगरी महालक्ष्मी अंबाबाईच्या आशीर्वादाने ही नगरी आहे. समुद्रसपाटीपासून ३१०० फूट उंचीवरील या ज्योतिबा डोंगराचा परिसर हा निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे.

देवा मंदी देव जोतिबा लय मोठा,<br>
चैताच्या महिन्यात त्याच्या फुलल्या चारी वाटा !

अशी लोकगीतांतून येणारी रचना म्हणजे तिथे येणाऱ्या भाविकांच्या गर्दीचे द्योतक आहे. जोतिबाच्या जत्रेच्या निमित्ताने महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील असंख्य भाविक इथे येत असतात. त्यांचे हे येणे वर्षभर चालते. जोतिबाच्या दर्शनाने त्यांना मिळणारा आनंदभाव यातून कोल्हापूर-जोतिबा या मार्गावर नेहमीच रहदारी सुरू असते. असे हे धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे.

## ज्योतिबा देवस्थान-

कोल्हापूर जिल्ह्याच्या वैभवात तसेच भौतिक व ऐतिहासिक ऐश्वर्यात मोलाची भर घालणारा हा तीर्थक्षेत्रीय परिसर 'वाडी रत्नागिरी' या नावाने परिचित आहे. वाडी रत्नागिरीतील हे 'जोतिबा देवस्थान' हे कोल्हापूरच्या वायव्येस १७.५ किलोमीटर अंतरावर आहे. सह्याद्रीच्या डोंगर कडेने पन्हाळागड, पावनगड असा जो मार्ग गेला आहे; त्याच्यापुढे सोंडेसारखा शंकाकृती भाग जो वर गेलेला दिसून येतो, तोच जोतिबाचा डोंगर. या डोंगरावर प्राचीन काळापासून प्रसिद्ध असलेले हे जोतिबाचे पुरातन मंदिर आहे. पहाटेच्या वेळी येथील वातावरण खूपच प्रसन्न आणि अल्हाददायक असते.
येथील श्री ज्योतिबा देवस्थान महाराष्ट्राचे लोकदैवत म्हणून प्रसिद्ध आहे.

## अभ्यासाची उद्दिष्टे

1) महाराष्ट्रात असणाऱ्या धार्मिक अशा पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे.
2) कोल्हापूरचा 'दख्खनचा राजा जोतिबा' या धार्मिक पर्यटन स्थळाचा अभ्यास करणे.
3) कोल्हापूरच्या 'दख्खनचा राजा जोतिबा' या धार्मिक पर्यटनाचे स्वरूप व स्थळाचे महत्त्व अभ्यासणे.

## संशोधन पद्धती -

सदर शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक अशा दुय्यम संशोधन पद्धतीचा अभ्यासाकरिता वापर केलेला आहे. सदर शोधनिबंधासाठी आवश्यक असणारी संशोधनात्मक माहिती विविध पर्यटनविषयक ग्रंथ, जोतिबा विकिपीडिया, सांकेतिक स्थळ यांच्या माध्यमातून घेण्यात आलेली आहे. या शोधनिबंधासाठी दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे.

## दख्खनचा राजा जोतिबा या धार्मिक स्थळाचे महत्व-

जोतिबा मंदिर हे महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील मंदिर आहे. जोतिबा या देवतेला ज्योतिर्लिंग, केदारलिंग, रवळनाथ, सौदागर,अशा विविध नावाने ओळखले जाते. दक्षिण काशी म्हणून भारतभर कीर्ती असलेल्या करवीर पीठास धर्मशास्त्रात अनन्य साधारण असे महत्त्व आहे.

श्री.जोतिबा अथवा केदारनाथ हे बद्रीकेदारनाथाचे रूप आहे. ब्रह्मा-विष्णु-महेश,आणि जगतदामी या सर्वांचा मिळून एक तेजपुंज अवतार म्हणजे जोतिबा किंवा केदारनाथ ! जोतिबा या नावाची उत्पत्ती ज्योत या शब्दापासून झाली असून ज्योत म्हणजे तेज ! वायू, तेज,आप,आकाश व पृथ्वी या पंचमहाभूतांपैकी तेजाचे शक्तीदैवत म्हणजे वाडी रत्नागिरीचा जोतिबा! पौगंड ऋषीच्या वंशाला दिवा नव्हता त्यांनी तपश्चर्या करून बद्रीनाथांना संतुष्ट केले. बद्रीनाथाची पौगंड ऋषी व त्याची पत्नी विमलाबुजा यांच्या पोटी जन्माला येण्याचे वचन दिले. त्याप्रमाणे चैत्रशुद्ध षष्ठीच्या मुहूर्तावर स्वतः आठ वर्षाची बालमूर्ती होऊन, बद्रीनाथ हे ऋषी दांपत्यासमोर अवतरले.

ही बालमूर्ती बद्रीनाथची प्राणज्योत म्हणून त्याचे नाव जोतिबा असे ठेवले. आपला पुत्र हा जगात कर्ताकरविता व गरिबांचा कैवारी असावा; अशी विमलाबुजांची तीव्र इच्छ होती. श्री.जोतिबाला गुलाल, दवणा, खोबरे,व खारीक,प्रिय असून दवणा ही वनस्पती आवडते. हा दवणा गंध, सत्व, रज, तम गुणयुक्त आहे.

## पर्यटन ही संकल्पना-

'पर्यटन' हा शब्द संस्कृतमधील 'परि' म्हणजे भोवती किंवा सर्वत्र आणि 'अटन' म्हणजे भ्रमण करणे किंवा फिरणे असा या दोन शब्दांपासून बनला आहे. याचा अर्थ 'सर्वत्र फिरणे' किंवा 'विशिष्ट उद्देशाने केलेला प्रवास' असा होतो.

व्यक्ती आपल्या राहत्या ठिकाणापासून मनोरंजनासाठी, व्यवसायासाठी, शिक्षणासाठी आणि अगदी आनंद मिळविण्यासाठी दुसऱ्या ठिकाणी जाऊन एक-दोन दिवस वास्तव करते, तेव्हा त्याला 'पर्यटन' म्हटले जाते.

या पर्यटनामध्ये पर्यावरणीय, ऐतिहासिक, कृषी, वैद्यकीय आणि धार्मिक असे पर्यटनाचे प्रकार दिसतात. ‘श्री.जोतिबा देवस्थान’ हे धार्मिक पर्यटनामध्ये येते.

## कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन -

दख्खनचा राजा श्री.जोतिबा, श्री. कात्यायनी देवी, नृसिंहवाडी येथील श्री. क्षेत्र दत्तमंदिर, बाहुबली येथील जैन धर्मियांचे पवित्र क्षेत्र, मोरजाई देवीचे पठार, श्री.बाळूमामा देवस्थान, कोपेश्वर मंदिर, कणेरी येथील श्री.काडसिद्धेश्वर मठ, गगनगडावरील श्री.गगनगिरी महाराज मठ त्याचप्रमाणे ऐतिहासिक शालिनी पॅलेस, भुदरगड किल्ला, शिवगड, पन्हाळागड, विशाळगड अशी धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळे, देखणा रंकाळा तलाव, कोल्हापूरचा प्रसिद्ध दूध कट्टा, गुळ, तांबडा-पांढरा रस्सा, कोल्हापुरी चप्पल अशा अनेक गोष्टींसाठी कोल्हापूरचा नावलौकिक आहे. मुख्य शहर आणि त्याच्या जवळपास असणारी ही ठिकाणे पर्यटनाच्या दृष्टीने अगदी सोयीची आहेत. त्यामुळे पर्यटनासाठी म्हणून कोल्हापूर जिल्हा हा अनेकांच्या पसंतीचा आहे. शिवाय इथले हवामान, भौगोलिक स्थिती आणि समाज या सगळ्याचा विचार करता पर्यटन दृष्ट्या हा जिल्हा अगदी लोकप्रिय ठरतो.

जेव्हा लोक धार्मिक स्थळाला भेटी देतात तेव्हा त्यांच्या मनामध्ये त्या स्थळाविषयीचे माहात्म्य असते पण यासोबतच त्या देवस्थानची विशेष पूजा, उत्सव, मिरवणूक किंवा नैमितिक उत्सव हे पर्यटनाचे निमित्त ठरतात. काहीवेळा असे होते की कोल्हापूर जिल्हा आणि त्याच्या आसपासच्या या इतर ठिकाणांना लोक आवर्जून भेट देतात. त्यामुळे भक्तिभावाने येणारे

भाविक यांचे होणारे पर्यटन आणि इतर ठिकाणांना भेटी देत येणारे पर्यटक यांचे पर्यटन अशा दोन्ही प्रकारचे पर्यटन या ठिकाणी होताना पाहायला मिळते. इथे आल्यानंतर श्री. ज्योतिबाचे मंदिर, मंदिराची रचना, मूर्ती हे लोक आवर्जून पाहतात. भौगोलिकदृष्ट्या असलेले मंदिराचे स्थान हा घटकही पर्यटनासाठी कारणीभूत ठरतो.

## दख्खनचा राजा ज्योतिबाचे उगमस्थान-

जोतिबा संदर्भात एक परंपरागत कथा सांगितली जाते. प्राचीन काळात कोल्हापूर परिसरात दैत्यानी अहंकार माजवला होता. येथील जनता त्यांच्या छळाला कंटाळून गेली होती. कोल्हापूरच्या अंबाबाईलाही या दैत्यांपासून त्रास होत होता. या दैत्यांपासून, त्यांच्या छळापासून लोकांची मुक्तता करण्यासाठी अंबाबाईने तपश्चर्या करून, केदारेश्वराला या दैत्यांचा संहार करण्याची विनंती केली. केदारेश्वराने या दैत्यांशी युद्ध करून, त्यांचा प्रमुख असलेल्या रत्नसूराचा वध या डोंगरावर केला. म्हणून या डोंगराचे नाव 'वाडी रत्नागिरी' असे पडले. रत्नासूराच्या वधानंतर अंबाबाईने अशी प्रार्थना केली, की पुन्हा असे संकट येऊ नये. अंबाबाईच्या प्रार्थनेला मानत, रक्षणाकरिता जोतिबाचे मंदिर कोल्हापूरच्या दक्षिणाभिमुख असे आहे.

## जोतिबाच्या मंदिराची रचना-

श्री.जोतिबाचे आज जे मोठे मंदिर दिसते आहे; त्या ठिकाणी पूर्वी छोटेसे देवालय होते. मूळ मंदिर कराड जवळच्या किवळ येथील नवजीबुवा साळुंखे केवळकर संत (नावजीनाथ) नामक भक्ताने बांधले होते. आज जे देवालय आहे ते इसवी सन १७७० मध्ये ग्वाल्हेरचे महाराज राणोजीराव शिंदे यांनी या ठिकाणी भव्य स्वरूपात पुनर्रचित करून बांधले. देवळाकडे जाताना प्रथम मराठा शैलीतील भव्य दगडी प्रवेशद्वार लागते. या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर पायऱ्या उतरताच तीन देवळांचा समूह दृष्टीस पडतो. या तीन देवळांच्या मध्यभागी जोतिबाचे मुख्य देवालय आहे. हे देऊळ ५७ फूट लांब ३७ फूट रुंद असून त्याच्या शिखराची उंची ७७ फूट आहे.या देवाळा शेजारी केदारेश्वराचे देवालय आहे. या देवालयाचे बांधकाम १८०८ मध्ये दौलतराव शिंदे यांनी केलेले आहे. या देवळाची लांबी ४८ फूट असून रुंदी २२ फूट आहे. शिखर ८९ फूट उंच आहे. केदारेश्वर देवळासमोर दोन पाषाणाचे नंदी आहेत. येथे असलेल्या रामलिंग मंदिराचे बांधकाम १७८० मध्ये मालजी निकम पन्हाळकर यांनी केलेले आहे. या मंदिराची लांबी १३ फूट आणि रुंदी १३ फूट असून शिखर ४० फूट उंच आहे. या देवळाजवळ चोपडा देवीचे मंदिर असून या मंदिराचे बांधकाम १७५० मध्ये प्रीतीराव चव्हाण हिम्मतबहादूर यांनी केलेले आहे. या देवळापासून थोड्या अंतरावर यमाई देवीचे मंदिर आहे. या मंदिराचे बांधकाम १७५० मध्ये राणोजीराव शिंदे यांनी केले आहे. या मंदिरासमोर पाण्याचे दोन तीर्थ असून जवळच सहा कुंड व दोन विहिरी आहेत. कोल्हापूर परिसरातील मंदिरांच्या शिखराप्रमाणे येथील मंदिराच्या शिखराची रचना आहे. यादवकालीन वास्तुशालीत थोडा फरक करून जानवारी मराठा कारागीरांनी या शिखराचे बांधकाम केले. या क्षेत्रावर तळापासून वरपर्यंत रथपट पद्धतीची साधी नशी आहे. तत्कालीन मराठा वास्तुशैलीचा प्रभाव येथे या मंदिरावर आढळतो.या मंदिराच्या बांधकाम याच डोंगरावर सापडणाऱ्या काळ्या बेसाल्ट दगडाचा वापर करून झालेले आहे. या देवालयाच्या प्रांगणात पारंपरिक दगडी दीपमाळ आहे.

## जोतिबाची मूर्ती

जोतिबाची मूर्ती काळ्या घोटीव पाषाणात घडवलेली आहे. ही चतुरभुज मूर्ती असून हातात खडक, पानपात्र, डमरू व त्रिशूल आहे. शेजारीच जोतिबाचे उपवाहन शेष आहे. जोतिबाचा शरीर रक्षक काळभैरव बाहेरच्या बाजूस असून तेथे मूळ ज्योत

तेवत असते.जोतिबाचे दर्शन घेण्याअगोदर काळभैरव व ज्योतीचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. जोतिबाची भार्या मयाई हिची मूर्ती दगडाची असून या मूर्तीला शेंदूराचा लेप लावलेला असतो. भाविक या यमाईचेही दर्शन घेतात.

### जोतिबाची पूजा

जोतिबा देवाची रोज तीन वेळा पूजा बांधली जाते. पहिली साधी पूजा, दुसरी सकाळच्या महाभिषेकापूर्वी खडी पूजा आणि तिसरी अभिषेकानंतर बैठी पूजा असते. ती दुपारनंतर बांधण्यात येते. दर शनिवारी श्री.जोतिबाची दुपारी बारा ते तीन या वेळेत घोड्यावर बसलेली पूजा बांधली जाते.

### जोतिबाची चैत्र यात्रा व सासनकाठी उत्सव-

श्री.देव जोतिबाची चैत्र यात्रा आणि सासनकाठी उत्सव म्हणजे भाविकांच्या श्रद्धेचा खूप मोठा महोत्सव असतो. जोतिबाच्या जन्मदिवशी रविवारी व श्रावण शुद्धषष्ठीला येथे भाविकांची मोठी गर्दी असते. रत्नासुरावर मिळवलेल्या विजया प्रित्यर्थ चैत्री पौर्णिमेस येथे भव्य जत्रा भरते. चैत्री पौर्णिमेच्या दिवशी जोतिबाच्या मूर्तीची मिरवणूक पालखीतून वाजत-गाजत यमाई देवीच्या मंदिराकडे निघते. या मिरवणुकीत अनेक सासन काठ्या नाचवत नेल्या जातात. जोतिबाच्या या यात्रेत ९६ छोट्या-मोठ्या सासन काठ्या असतात.

हस्त नक्षत्रावर दुपारी दीड वाजता सासन काठीच्या मिरवणुकीस प्रारंभ होतो.त्यावेळी देवस्थान कमिटीचे भालदार-चोपदार, पालकमंत्री तीर्थक्षेत्र पाडळी (निनाम) हे मानाच्या सासनकाठीचे पूजन करून, संत नावजीनाथाच्या किवळकाठीस पानाचा विडा देऊन आमंत्रण देतात. तोफेच्या सलामीने मिरवणुकीस प्रारंभ होतो. या मिरवणुकीमध्ये पहिला मान तीर्थक्षेत्र पाडळी (निनाम) तालुका, जिल्हा, सातारा,या सासनकाठीचा आहे. नंतर पाटण तालुक्यातील मौजे विहे, करवीर कोल्हापूरची हिम्मत बहादुर चव्हाण, वाळवा तालुक्यातील करंजवडे. त्याचबरोबर मध्य प्रदेशातील ग्वाल्हेरचे शिंदे, कोल्हापूरचे छत्रपती अशा मानाच्या सासनकाठ्या असतात. सोबतच मिरज तालुक्यातील कसबा डिग्रज, कागल तालुक्यातील कसबा सांगाव, सातारा जिल्ह्यातील किंवळ, सांगली जिल्ह्यातील कवठे, कराड तालुक्यातील रेटरे बुद्रुक यांच्या मानाच्या १८ सासन काठ्या सहभागी होतात. अशा सगळ्या मिळून ९६ सासन काठ्या उत्सवात सहभागी होतात. पूर्वी ज्योतिबा देवस्थानास शिंदे सरकारकडून अनुदान मिळत असे, सध्या इनामी गावच्या उत्पन्नातून देवस्थानचा खर्च भागविण्यात येतो.

या सासनकाठी उत्सवामध्ये पहिला मान असलेली सातारा जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र पाडळीची सासनकाठी दिमाखात भक्तगण नाचवत असतात. गडद गुलाबी आणि पांढऱ्या रंगाचे उच्च रेशमी वस्त्र,धवल रंगाचे गंगावन,सुती तोरण्या आणि बसण्यावर सुवर्ण पादुका असा साज या सासनकाठीचा असतो. या सासनकाठीला १८ देवसेवक असतात. तीर्थक्षेत्र पाडळी गावचे भक्तगण १२० किलोमीटरहून अधिक अंतर काटत ते वाडी रत्नागिरी येथे चार दिवसांमध्ये, सासनकाठी घेऊन पायी चालत येतात. परतीचा प्रवासही तसाच करतात. एकूण आठ दिवसांचा पायी प्रवास म्हणजे मानाच्या सासनकाठीचा एक धार्मिक पर्यटन महोत्सवच होत असतो. हा पायी प्रवास तीनशे किलो वजनाची सासन काठी घेऊन सुरू असतो. यामध्ये सासनकाठी आणि श्रीफळाची तोरणे, धन, हारतुरे , तांबडी पागोटी, असे एका आड एक तिरपे गुंडाळलेले असतात. या बांबूच्या तळापासून चार ते पाच फूट उंचीवर आडवी फळी घट्ट बांधलेली असते.ही फळी खांद्यावर घेऊन भक्तगण काठी नाचवतात. या काठीचा तोल जाऊ नये म्हणून काठीला बांधलेले दोर ताणून लोक उभे असतात.या फळीवर घोड्याची व देवांची प्रतिमा कोरलेली असते. ढोलताशांच्या तालावर भक्तगण देहभान विसरून काठ्या नाचवत असतात. जोतिबाच्या धार्मिक विधीत उंट,

घोडे, हत्ती पूर्वीपासून यांना फार मोठा मान आहे. अशा भव्यदिव्य स्वरूपात श्री. जोतिबाची यात्रा लहान-मोठ्या स्वरूपात नेहमीच भरत असते.

### धार्मिक पर्यटन महोत्सवाचे स्वरूप-

कोल्हापूर जिल्ह्यातील श्री. जोतिबा हा केदारलिंगाचा अवतार मानला जातो. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील असंख्य कुटुंबांचे कुलदैवत असणाऱ्या जोतिबाच्या दर्शनासाठी वर्षभरामध्ये कितीतरी भाविक या जोतिबाच्या डोंगरावर येत असतात. दर्शन घेण्यासाठी येणारे नवपरिणीत जोडपे हे तर इथले नेहमीचे दृश्य असते. मनात कोणतीतरी इच्छा धरून येणारे आणि इच्छापूर्ती झाली म्हणून पुन्हा येणारे, अशा या सर्व भाविकांचे हे येणे म्हणजे धार्मिक पर्यटनच असते. या येणाऱ्या भाविकांसाठी ज्योतिबा मंदिर दिवस-रात्र खुले असते. चैत्रकाळात तीन दिवस, श्रावण षष्ठी यात्रा, चैत्र षष्ठी ललित सोहळा, विजयादशमीचा जागर असे खास भक्ती महोत्सव वेळोवेळी या देवस्थानात होत असतात. विशेष म्हणजे रविवार हा श्री.जोतिबाचा वार मानला जातो. त्यामुळे या दिवशी येणाऱ्या भाविकांची संख्या तुलनेने नेहमीच जास्त असते. या दिवशी अनेकजण सहकुटुंब, मित्रपरिवारासह देवस्थानला भेट देतात. भाविकांच्या या येण्यामुळेच ज्योतिबा मंदिर दिवस-रात्र खुले असते.

भाविक येताना देवाच्या मूर्तीला वाहण्यासाठी भेटवस्तू आणतो. इथून परत जात असताना इथल्या मंदिराच्या आसपास जे काही प्रसाद म्हणून भेटते, ते तो खरेदी करत असतो. मंदिराच्या आसपास तिथे असणाऱ्या स्थानिक गुरव समाजातील आणि इतर समाजातीलही लोकांची लहानमोठी दुकाने तिथे आहेत. जिथे देवासाठी लागणारे सगळे साहित्य मिळते. शिवाय देवाचा प्रसाद म्हणून खास पॅकिंग केलेली पॅकेट्स मिळतात. या मंदिराच्या आसपास अशीही सोय आहे की येणाऱ्या भक्तगणांसाठी ऑर्डरप्रमाणे पुरणपोळीचे जेवण करून दिले जाते. त्याचप्रमाणे राहणाऱ्या भक्तगणांसाठी सुद्धा या ठिकाणी सोय आहे. आपल्याला परवडणाऱ्या दरात ही सोय घेतली जाते. वर्षानुवर्ष अशी काही कुटुंब हाच व्यवसाय करतात. त्यामुळे पर्यटनाच्या निमित्ताने जी काही आर्थिक उलाढाल होते; ती इथे प्रामुख्याने पाहायला मिळते. लांबून येणारे भक्तगण हे नेहमीच संख्येने जास्त असतात. स्थानिक किंवा जवळपासचे असणारे भक्तगण हे सुद्धा या सगळ्यांमध्ये सहभागी असतात. या भाविकांमध्ये लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सगळ्या वयोगटातील आणि समाजातल्या सगळ्या स्थरातील माणसे सहभागी होतात. हा इथल्या भक्ती प्रवाहाचा विशेष आहे. त्यामुळे मध्य प्रदेश,महाराष्ट्र व देशाच्या इतर भागातून लाखो भाविक येथे येतात.जोतिबाचा डोंगर माणसांनी अक्षरशः फुलून जातो. तेव्हा त्या डोंगरावर सगळीकडे माणसेच माणसे आणि उधळलेला लाल गुलाल असाच एक माहोल तयार झालेला दिसतो.

### निष्कर्ष-

१) कोल्हापूर येथील ‘दख्खनचा जोतिबा देवस्थान’ हे महाराष्ट्राचे लोकदैवत म्हणून प्रसिद्ध आहे.

२) श्री.जोतिबा हे बद्रिकाश्वराचे रूप मानले जाते. ब्रह्मा,विष्णू, महेश,आणि जगजगत् दामिनी या सर्वांचा मिळून एक तेजपुंजावतार म्हणजेच जोतिबा होय.

१) जोतिबा देवाची मूर्ती स्वयंभू असून ती साधारणपणे साडेचार फूट उंचीची आहे.

२) महाराष्ट्र व देशाच्या इतर भागातून येणाऱ्या लाखो भाविकांमुळे ज्योतिबा मंदिर दिवस-रात्र खुले असते.

३) चैत्रकाळात तीन दिवस, श्रावण षष्ठी यात्रा, चैत्र षष्ठी ललित सोहळा, विजयादशमीचा जागर असे खास भक्ती महोत्सव वेळोवेळी या देवस्थानात होत असतात.

४) रविवार हा श्री.जोतिबाचा वार मानला जातो. त्यामुळे या दिवशी येणाऱ्या भाविकांची संख्या तुलनेने नेहमीच जास्त असते.

## समारोप-

धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून कोल्हापूर जिल्ह्यातील हे श्री.जोतिबा देवस्थान महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेर प्रसिद्ध आहे. श्री.जोतिबा देवाचे मंदिर व आसपासचा परिसर हाच मुळात विलोभनीय असून इथे येणाऱ्या भक्तगणांची संख्या त्यामुळे दिवसेंदिवस वाढताना दिसते. श्री.जोतिबाचा सासन काठी उत्सव हा सगळ्यात मोठा उत्सव मानला जातो. या सासनकाठी उत्सवाच्या निमित्ताने लाखोंच्या संख्येने भाविक मंदिरास भेट देतात. शिवाय इतर लहान मोठ्या धार्मिक उत्सवांच्या निमित्ताने नेहमीच त्यांचे हे येणे म्हणजे धार्मिक पर्यटन असते. या पर्यटनाच्या निमित्ताने जसा आनंद मिळतो तसाच देवदर्शनाचाही आनंद मिळतो.

## संदर्भसूची-

१) बॉम्बे गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा.
२) कुलदैवत महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग प्रशासन,१९७४
३) महाराष्ट्र पर्यटन मंडळाच्या संकेतस्थळावरील माहिती.
४) Temple of Maharashtra- G. K.Kanhere.
५) गायकवाड प्रियांका -कोल्हापूरचा ज्योतिबा (माहितीपर लेख)
६) जोतिबा मंदिरास प्रत्यक्ष भेट व मुलाखत
७) दै.पुढारी कोल्हापूर आवृत्तीमधील लेख